आकाशवाणी मुंबई

राष्ट्री बातमीपत्र -रात्री ८.०५वाजता

२४ एप्रिल २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार थंडावला, शुक्रवारी मतदान

- अनुसूचित जाती- जमातींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आरोप

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित होत असल्याचं केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं अमरावतीच्या प्रचार सभेत प्रतिपादन, तर मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची टीका

- ऑनलाइन किंवा मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून नवे ग्राहक न जोडण्याचे कोटक महिंद्रा बँकेला रिझर्व्ह बँकेचे आदेश

**आणि**

- पूर्व आणि दक्षिण भारतात पुढचे ५ दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार आज संध्याकाळी संपला. १३ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ८८ लोकसभा जागांकरिता ही निवडणूक होईल. मणिपूरच्या बाह्य भाग लोकसभा मतदानक्षेत्राचा उर्वरित भागही यात समाविष्ट असेल.

| | | |
|---|---|---|
| केरळ २० | मध्यप्रदेश ६ | पश्चिम बंगाल ३ |
| कर्नाटक १४ | आसाम ५ | छत्तीसगढ ३ |
| राजस्थान १३ | बिहार ५ | मणिपूर १ |
| उत्तर प्रदेश ८ | त्रिपुरा १ | जम्मू काश्मीर १ |

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ जागांसह देशातल्या एकूण ८९ जागांवर शुक्रवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे. या टप्प्यात एकूण २०४ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज छत्तीसगडमधे अंबिकापूर इथं प्रचारसभा घेतली. अनुसूचित जाती- जमातींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. संविधानात बदल करुन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांचे अधिकार काँग्रेस त्यांच्या वोट बँकेला देत असल्याचा आरोप मोदी यांनी यावेळी केला. भाजपाच आरक्षणाचा बचाव करू शकते, असं ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आज **अमरावती** इथं प्रचार सभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित होत असल्याचं प्रतिपादन त्यांनी या सभेत केलं. भाजपा देशाचं संविधान बदलणार, आरक्षण संपवणार, अशा अफवा काँग्रेस पसरवत आहे, मात्र भाजपानं बहुमताचा उपयोग कलम ३७०, त्रिवार तलाक रद्द करण्यासाठी केला, असं त्यांनी सांगितलं. शरद पवार कृषी मंत्री असताना त्यांनी कुठलेही मोठे बदल कृषी क्षेत्रात केले नाहीत, अशी टीका अमित शहा यांनी यावेळी केली.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, राज्यसभा खासदार डॉक्टर अनिल बोंडे, आमदार रवी राणा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज अमरावती लोकसभा मतदारसंघात परतवाडा इथं प्रचारसभा घेतली. देशात, बेरोजगारीची समस्या सध्या अत्यंत तीव्र झाली असून, इंडिया आघाडीचं सरकार आलं तर पदवीधर आणि पदवीकाधारक विद्यार्थ्यांना सरकारी आणि खासगी क्षेत्रात अप्रेंटिशिप अर्थात शिकाऊ उमेदवार म्हणून काम करण्याचा अधिकार मिळेल, तसंच त्यांच्या बँक खात्यात दरवर्षी १ लाख रुपये जमा केले जातील, असं ते यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर त्यांनी कडाडून टीका केली. इंडिया आघाडीला सत्ता मिळाली, तर गरीब शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जाईल, जातनिहाय जनगणना केली जाईल, अशी आश्वासनं त्यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज **हिंगोली** लोकसभा मतदारसंघात वसमत इथं प्रचारसभा घेतली. गेल्या दहा वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाच्या करिश्म्यामुळे जगात देशाची मान उंचावली आहे, असं ते म्हणाले. **वाशीम-**

**यवतमाळ** लोकसभा मतदारसंघात वाशिम इथं शिंदे यांनी रोड शो केला. यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी भव्य बाईक रॅली काढून प्रचार केला.

**यवतमाळ** वाशिम लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही आज पुसद इथं प्रचारसभा घेतली. सभा सुरु असतानाच भोवळ येऊन ते कोसळले, कार्यकर्त्यांनी त्यांना सावरत मंचावरून उचलून नेलं आणि तातडीनं त्यांच्यावर डॉक्टरांनी उपचार केले. त्यानंतर त्यांनी पुन्हा भाषण केलं. या सभेनंतर ते वरुडला प्रचारासाठी रवाना झाले.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज **नांदेड** जिल्ह्यात भोकर इथं बातमीदारांशी संवाद साधला. देशात लोकशाही वाचवण्यासाठी सर्व घटक एकत्रित आले आहेत. देशात संविधान बदलाची भीती निर्माण झाली आहे. एकूणच देशात हुकूमशाही विरोधात लाट निर्माण झाली आहे, शेतकऱ्यांमध्येही केंद्र सरकारविरुद्ध असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडी तर देशात इंडिया आघाडीला यश मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उद्धव ठाकरे यांनी हिंगोली लोकसभा मतदारसंघातल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचार सभा झाली.

**<><><><><>**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत आज रत्नागिरीत बुद्धिजीवी वर्गातल्या मान्यवरांची विशेष बैठक आयोजित केली होती. खासदार म्हणून रत्नागिरीच्या विकासाला वेग देण्याचं काम करण्याची ग्वाही राणे यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

माहिती तंत्रज्ञान यंत्रणेतल्या त्रुटींमुळं ऑनलाइन किंवा मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून नवे ग्राहक न जोडण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेनं कोटक महिंद्रा बँकेला दिले आहेत. नवे क्रेडिट कार्ड देण्यावरही रिझर्व्ह बँकेनं निर्बंध लादले आहेत. पुढील आदेशापर्यंत रिझर्व्ह बँकेचे हे निर्बंध कायम राहणार आहेत. विद्यमान बँक खातेधारक आणि क्रेडिट कार्ड धारकांना मात्र कोटक महिंद्रा बँक सेवा देऊ शकेल.

रिझर्व्ह बँकेनं सलग २ वर्ष कोटक महिंद्रा बँकेच्या माहिती तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधांचं परीक्षण केलं आणि त्यात आढळून आलेल्या त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले होते. या त्रुटींमुळं बँकेच्या यंत्रणेत वारंवार बिघाड होत होते आणि सेवेत अडथळे निर्माण होत होते. यासंदर्भात वारंवार निर्देश देऊनही सुधारणा न केल्यानं रिझर्व्ह बँकेनं कोटक महिंद्रा बँकेवर हे निर्बंध लादले आहेत.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रावरची मतमोजणी आणि व्हीव्हीपॅट पावत्या यांची संपूर्ण पडताळणी करण्यासंदर्भातल्या याचिकेवरचा निकाल सर्वोच्च न्यायालयानं आज राखून ठेवला. आज याचिकेवरच्या सुनावणीत निवडणूक आयोगानं इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांची कार्यप्रणाली तसंच सुरक्षिततेबाबत सविस्तर माहिती न्यायपीठाला दिली. मतदानयंत्रामध्ये फेरफार करणं अशक्य असल्याचं निवडणूक आयोगानं न्यायालयाला सांगीतलं. त्यावर न्यायालयानं विश्वास व्यक्त केला आणि मतदानपत्रिकेवर निवडणूक घेण्याची पद्धत पुन्हा सुरु करणं अमान्य असल्याचं सांगितलं. मात्र सध्याची मतदान पद्धत बळकट करण्यासाठी काय सुधारणा करता येतील याकडे लक्ष देऊ, असं सांगितलं.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण सातारा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केरळमधे अलाप्पुझा इथंही प्रचारसभा घेतली. काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षांनी अल्पसंख्याक मतपेढीसाठी केरळमध्ये दहशतवादाला प्रोत्साहन दिलं असून हे दोन्ही पक्ष पीएफआय आणि एसडीपीआय सारख्या देशविरोधी शक्तींचा पाठिंबा घेत आहेत, असा आरोप त्यांनी यवेळी केला. भाजपाच्या राजवटीत पीएफआय सारख्या देशविघातक  संघटनांची वाढ होऊ देणार नाही, केरळला हिंसाचाराच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी ही निवडणूक आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

पूर्व आणि दक्षिण भारतात पुढचे ५ दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान  विभागानं व्यक्त केली आहे. ओदिशा किनारपट्टी, पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्कीम आणि कर्नाटकच्या आंतर्भागात ही लाट तीव्र असेल, अशी शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे. उद्यापासून येत्या रविवारपर्यंत वायव्य भारतात पाऊस पडण्याची शक्यता आहे. ईशान्य भारतात येत्या शनिवारी आणि रविवारी सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ८ षटकात ३ बाद ५८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

**सांगली** जिल्ह्यातले ज्येष्ठ साहित्यिक वसंत केशव पाटील यांचं आज निधन झालं. ते ७८ वर्षाचे होते. १९९६ मध्ये त्यांच्या 'दशद्वार ते सोपान' या पुस्तकाला अनुवादासाठीचा ‘साहित्य अकादमीचा पुरस्कार’ मिळाला होता.

**//<><><><><>//**